MHSO110018612026

<u>नियमित दिवाणी दावा क्र **470/2026**</u>

**मुबारक नजिर दन्‍नो वि. गजानन प्रल्हाद गिरमे**

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ नुसार दाव्यात दुरुस्ती करण्यास परवानगी मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. वादीचे कथन असे की, त्यांना काही कागदपत्रे आढळून आली आहेत. त्याअनुषंगाणे वादी दाव्यामध्ये अर्जात नमुद मजकूर समाविष्ट करुन दाव्यामध्ये दुरूस्ती करु इच्छीत आहेत. शेवटी प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात यावा अशी विनंती त्यांनी केली आहे.

३. प्रतिवादींनी नि.क्र.२१ कडे त्यांचे म्हणणे दाखल करुन वादीची प्रस्तुत अर्जातील कथने नाकारली आहेत. प्रतिवादीचे म्हणणे असे की, वादीने दाव्यामध्ये मागीतलेल्या दुरुस्त्यांमुळे दाव्याचे स्वरुप बदलणार आहे. दुरुस्तीमजकू हा दाव्यातील गुंतागुंत वाढविणारा आहे. प्रस्तुतचा अर्ज मंजुर झालेस प्रतिवादीचे कधीही व कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे त्यांनी प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. दोन्ही बाजुतर्फे वकीलांचा विस्तृत युक्तीवाद ऐकला.

५. प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादीनी प्रस्तुतचा दावा निरंतर ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुतचा दावा प्रलंबित असताना वादीस काही कागदपत्रे आढळून आली आहेत. त्याअनुषंगाणे वादी दाव्यामध्ये अर्जात नमुद मजकूर समाविष्ट करुन दाव्यामध्ये दुरूस्ती करु इच्छीत आहेत. त्यामुळे दावा प्रलंबित असताना झालेले बदल व त्याबाबतची कथने अभिलेखावर येणे गरजेचे आहे. सदर दुरुस्तीमुळे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. सदरची दुरूस्ती ही मुळ दाव्यातील मागणीशी अनुषंगीक आहे. सदर दुरुस्तीचा अर्ज मंजुर केल्यास गुणावगुणांवर दाव्याचा अंतिम निर्णय देणेस मदतच होणार आहे.

प्रस्तावित दुरूस्तीमुळे मुळ दाव्याचे स्वरुपात अथवा दाव्याच्या कारणांमध्ये कोणताही बदल होत नाही.

६. प्रतिवादीने यादी निशाणी २५ सोबत मा. मुंबई उच्च न्यायालयाचे **रवी आशिष बिल्डर लि. वि. शारदादेवी यादव २०२४(३) ऑल एमआर** हा न्यायनिवाडा दाखल करुन जास्तीत जास्त खर्च आकारण्याची विनंती केली आहे. उपरोक्त चर्चेवरुन व प्रतिवादीने दाखल केलेल्या न्यायनिवाडयाच्या अवलंबुन वादी यांच्यावर रु. १०००/– इतका खर्च आकारणे उचित ठरेल. सबब, अर्ज मंजुर होणेस पात्र आहे. परिणामी, मी खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

**– आदेश –**

१. प्रस्तुत दुरूस्ती अर्ज निशाणी क्र. १९ मंजूर करण्यात येत आहे.

२. वादीने रु. १०००/– इतका खर्च प्रतिवादी यांचेकडे पुढील तारखेपर्यंत अथवा त्यापूर्वी जमा करावा.

३. वादीने अर्जात नमुद प्रमाणे दाव्यामध्ये दुरूस्ती करुन दुरुस्त दाव्याच्या प्रती कायद्यातील विहीत तरतुदीनुसार अभिलेखावर दाखल कराव्यात.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by RAJENDRA DHANAJI SHINDE
Date: 2026.08.06 17:54:21 +0530

**(आर. डि. शिंदे)**

४थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,

माळशिरस

दिनांक :०६/०८/२०२६